# संपादकीय

2020 संपणारे वर्ष अनेक अर्थाने वेगळे ठरले. covid-19 च्या विषाणूने संपूर्ण जगाला टाळेबंदीत ढकलण्यात बाध्य केल्याने त्याचा मानवी जीवनावर सखोल परिणाम घडून आला. परिणामाच्या क्षेत्रात शिक्षण क्षेत्रालाही जबर फटका बसला. हाताळल्या न गेलेल्या अशा नव्या संसाधनाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राचा सांधा या काळात टिकवून ठेवण्यावर भर दिला गेला. शिक्षणासोबतच साहित्याच्या आविष्करणावर प्रारंभी मर्यादा आपल्यात. त्यामुळे संशोधन क्षेत्रात कार्यरत अनेक संस्थांना आपले लिखाण प्रकाशित करता आले नाहीत. मात्र अशा आपत्कालीन परिस्थितीत हौसा पब्लिकेशनने 'नवज्योत' संशोधन पत्रिका नियमित प्रकाशित केली. प्रकाशन कर्ता आणि संशोधन पेपर लिहिणारे यांच्यामुळेच पत्रिकेचे सातत्य टिकून राहिले हे सुध्दा वास्तव होय. संशोधकांना लिहिते ठेवण्यात संशोधन पत्रिका संचालित करणाऱ्यांना किती कष्ट घ्यावे लागतात हे वस्तुतः या परिघाच्या बाहेर असणाऱ्यांना एकतर ज्ञात नसते आणि असले तरी तो त्यांच्या दृष्टीने फारसा विचारनीय प्रश्न नसतो. 'नवज्योत' संशोधन पत्रिकेने प्रारंभापासूनच काही मानदंड प्रस्थापित केले त्यातील महत्त्वाचे म्हणजे संशोधन पेपरचा सतत येत राहणारा रतीब याची दक्षता घेतली. त्यामुळे प्रकाशनात अडचणी उद्भवल्या नाही.

कोव्हिडच्या काळातच परंतु 2020चा सरत्या वर्षातील हा अंक तितकाच महत्त्वपूर्ण आणि संशोधन विषयाची बाजू उंच करणार आहे. आंतरविद्याशाखीय पत्रिका असल्याने या अंकात आलेले संशोधन लिखाण विविध शाखांशी आणि विषय पैलूंशी निगडित आहे.आंतरराष्ट्रीय प्रश्न, त्या संदर्भातील दृष्टिकोण, तथ्यात्मक मांडणी ते स्थानिक प्रश्नांची उकल, शासन धोरणे यांची चिकित्सा ही मांडणी हे या प्रकाशित पत्रिकेचे वैशिष्ट्य आहे. शेती, परराष्ट्र धोरण, कश्मीरचा कळीचा प्रश्न, क्रीडा क्षेत्रातील संशोधन, असा व्यापक पट या प्रकाशित पत्रिकेला लाभलेला आहे. "ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानविस्तार"या दृष्टीने सदर लिखाण उपयुक्तकारक आहे. संशोधन क्षेत्रात कार्यरत संशोधक, अभ्यासक, वाचक, लेखन कर्ते यांच्याकरिता ही संशोधन पत्रिका पथदर्शक आहे. अत्यंत विषम परिस्थितीत सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवण्याचे कार्य संशोधन प्रकाशन करीत आहे. त्यात निश्चितच संशोधन लेखनकरणा-यांचा वाटा आहे. 'नवज्योत' चे प्रकाशन अशा वाटेकरींमुळे सातत्य राखण्यास साहाय्यभूत ठरले.

या अंकाचे संपादकीय लिहिण्याबाबतचा विश्वास प्रकाशक, संस्थापक डॉ. रवींद्र भणगे, प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दर्शविल्याने मी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. ही संशोधन पत्रिका आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल अशी मनोकामना याप्रसंगी व्यक्त करतो. 2021 च्या नववर्षाच्या आपणास सहृदय शुभेच्छा. आपल्या प्रगतीच्या वाटचालीत "नवे वर्ष, नवे पर्व" ठरो या स्नेहमयी शुभेच्छासह धन्यवाद.

डॉ. संदीप तुंडूरवार.
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग.
श्री बिंझानी नगर महाविद्यालय नागपुर